# घटक - सर्वोच्च न्यायालय

⇒ सर्वात वरीष्ठ न्यायालय - एकात्मिक न्याय व्यवस्था.

⇒ १९३५ च्या कायद्यानुसार केंद्र व राज्यांचे कायदे यांची अंमलबजावणी.

अमेरिकेत संघराज्यीय न्यायव्यवस्था ⟶ संघराज्य कायद्याची अंमलबजावणी

राज्य —॥— ⟶ राज्याच्या —॥—

२८ जाने १९५० - सर्वोच्च न्यायालयाचे उद्घाटन.

१९३५ च्या कायद्याने स्थापन झालेल्या संघराज्यीय (Federal Court) न्याया.च्या जागी.

राज्यघटनेचा भाग क्र - ५ - कलम १२४ ते १४७ - सर्वोच्च न्याया. संदर्भात.

संसदेला याचे नियमन करण्याचा अधिकार.

## संरचना

सध्या एकूण ३१ न्यायाधीश (एक मुख्य न्यायमूर्ती + ३० न्यायाधीश)

(फेब्रु २००९ मध्ये संख्या २६ वरून ३१ केली (केंद्राने))

सुरुवातीला १९५० ⟶ संख्या ७+१ = ०८

१९५६ ⟶ १०+१ = ११

१९६० ⟶ १३+१ = १४

१९७८ ⟶ १७+१ = १८

१९८६ ⟶ २५+१ = २६

## न्यायाधीश :

राष्ट्रपती सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची नियुक्ती करतो.

इतर न्यायाधीशांची नियुक्ती करताना मुख्य न्यायमूर्ती बरोबर विचार विनिमय करणे राष्ट्रपतीवर

बंधनकारक — १९८२ च्या खटल्यात विचारविनिमय म्हणजे सहमती नाही

⟶ १९९३ —॥— सहमती, परंतु मुख्य न्यायमूर्तींनी

सर्वात वरिष्ठ दोन सहकाऱ्यांशी चर्चा करूनच सल्ला द्यावा.

१९९८ – वरिष्ठ चार सहकाऱ्यांशी चर्चा करावी दोघांनी प्रतिकूल मत दिले तर

शिफारस करू नये – निकालाची अंमलबजावणी केली नाही तर बंधनकारक नाही.

९९ वी घ.दु. २०१४ व राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती अधिनियम २०१४ अन्वये कॉलेजियम

पद्धत रद्द — त्याजागी राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोग संस्थेची स्थाप.

२०१५ – सर्वोच्च न्यायालयाने ९९ वी घदु व रा. न्या. नियुक्ती आयोग २०१४ - घटनाबाह्य.

त्यामुळे कॉलेजियम पद्धत पुन्हा सुरु.

## सरन्यायाधीश नियुक्ती

१९५० पासून १९७३ पर्यंत सर्वात वरीष्ठ न्यायाधीशाची

(१९७३ – ए. एन रे व १९७७ मध्ये एम. यु. बेग)

१९९३ - खटला ⟶ ज्येष्ठ न्यायाधिशाची नियुक्ती करावी असा निर्णय -

Scanned by CamScanner

न्यायाधीश होण्यासाठी

**पात्रता**

१) भारताचा नागरिक.

२) अ – उच्च न्यायालयाचा किंवा सलगपणे उच्च न्यायालयांचा ५ वर्षे न्यायाधीश

ब) – उच्च न्यायालयात किंवा सलगपणे उच्च न्यायालयात १० वर्षे वकिली

क) – राष्ट्रपतीच्या मते अग्रगण्य कायदेतज्ञ असावा.

* किमान वयाची अट नाही

**कार्यकाल** : १) वयाची ६५ वर्षे पूर्ण होईपर्यंत

२) लिखित राजीनामा राष्ट्रपतींना.

३) संसदेच्या शिफारशीनुसार पदच्युत.

**शपथ** – राष्ट्रपती किंवा त्याने नियुक्त केलेला व्यक्ती.

**पदच्युती** : राष्ट्रपतीच्या आदेशाने – संसदेचे निवेदन आल्यानंतर (ठराव) } गैरवर्तणूक किंवा असमर्थता.

ठरावाला दोन्ही गृहाचे विशेष बहुमत आवश्यक

(न्यायाधीश चौकशी कायदा १९६८ अन्वये – नियमन)

→ प्रस्ताव – लोकसभेत १०० सदस्यांच्या स्वाक्षरीने

राज्यसभेत ५० —"—

→ लोकसभेचा सभापती किंवा राज्यसभेचा अध्यक्ष प्रस्ताव दाखल करून घेऊ शकतो किंवा दाखल करून घेण्यास नकार देऊ शकतो

→ त्यानंतर सभापती किंवा अध्यक्ष तीन सदस्यांची समिती स्थापन करतो.

समितीमध्ये : अ) सर्वोच्च न्यायालयाचा सरन्यायाधीश किंवा न्यायाधीश

ब) उच्च न्यायालयाचा मुख्य न्यायाधीश

क) अग्रगण्य कायदेतज्ञ.

→ जर तो दोषी आढळला तर गृह प्रस्तावावर विचारविनिमय करते.

→ आतापर्यंत एकही न्यायाधीश महाभियोग चालवून पदच्युत केला नाही.

**वेतन व भत्ते** –

| | सरन्यायाधीश | इतर न्यायाधीश |
|---|---|---|
| २००९ मध्ये | १ लाख (३३ हजार वरून) | ९० हजार (३० हजार वरून) |
| २०१८ | २.८ लाख | २.५ लाख. |

भत्ते, विशेष अधिकार, रजा आणि निवृत्तीवेतन.

खाजगी खर्चासाठी भत्ता, निशुल्क निवास व वैद्य. सेवा, कार दूरध्वनी. – निवृत्ती वेतन – निवृत्तीच्या वेळच्या 50%

**हंगामी सरन्यायाधीश** – खालील परिस्थितीत राष्ट्रपती नियुक्त करतो

① पद रिक्त असते.

② अनुपस्थित – तात्पुरत्या काळासाठी

③ कार्य करण्यास असमर्थ

## हंगामी न्यायाधीश

जेव्हा सर्वोच्च न्यायालयाची बैठक घेण्यास किंवा चालू ठेवण्यास गणपूर्तीचा अभाव असेल त्यावेळी सरन्यायाधीश उच्च न्याया. च्या न्यायाधीशाला तात्पुरत्या कालावधीसाठी हंगामी न्यायाधीश म्हणून नियुक्त करतो. (मात्र राष्ट्रपतींची पूर्वपरवानगी व संबंधित उच्च न्याया. न्यायाधीशाशी विचार विनिमय करून) त्याने पात्रता निकष पूर्ण केले पाहिजेत. अशा काळात आग्रक्रम सर्वोच्च न्याया. कामकाजाला व वेगळ असलेही सर्वोच्च न्याया. न्यायाधीशांचे.

## निवृत्त न्यायाधीश

भारताचा सरन्यायाधीश कधीही सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशाला किंवा सर्वोच्च न्यायालयाचा न्यायाधीश म्हणून नियुक्त होण्यास पात्र असलेल्या उच्च न्यायालयाचा निवृत्त न्यायाधीशाला तात्पुरत्या कालावधीसाठी न्यायाधीशपदी काम करण्याची विनंती करू शकतो.

(राष्ट्रपती व संबंधित व्यक्तीची पूर्वपरवानगी घेऊन)

भत्ते ⟶ राष्ट्रपती ठरवितील त्यानुसार

न्यायाधीशांचे → अधिकार, विशेष अधिकार, अधिकारक्षेत्र.

## सर्वोच्च न्याया. जागा

दिल्ली येथे.

सरन्यायाधीशास इतर ठिकाणी स्थापन करण्याचा अधिकार (एक किंवा अनेक)

याबाबत निर्णय राष्ट्रपतीच्या संमतीने.

## न्यायालयाची प्रक्रिया

सर्वोच्च न्यायालय राष्ट्रपतीच्या संमतीने कामाची पद्धती व प्रक्रिया याचे नियमन करण्यासाठी नियम बनवू शकते.

घटनात्मक बाबींचे खटले ——— } 5 न्यायाधीशांचे खंडपीठ

143 अनुसार राष्ट्रपतीने मागितलेला सल्ला }

इतर खटल्यात ———→ 3 किंवा अधिक ——

निर्णय खुल्या न्यायालयात / बहुमताने / भिन्न निर्णय देण्याचा अधिकार

## सर्वोच्च न्यायालयाचे स्वातंत्र्य

* संघराज्यीय न्यायालय
* मूलभूत हक्कांची हमी देणारे.
* राज्यघटनेचे संरक्षक
* अपिलाचे सर्वात वरिष्ठ न्यायालय

निष्पक्षपातीपणे काम करता यावे म्हणून राहिलेले तरतुदी.

① नियुक्तीची पद्धत

राष्ट्रपती (अर्थात मंत्रीमंडळ) न्यायव्यवस्थेच्या सदस्यांशी विचारविनिमय करून सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची नियुक्ती करतो. त्यामुळे कार्यकारी विभागाच्या

Scanned by CamScanner

मुख्याधिकाराच मर्यादा येणार.

② **कार्यकालाची हमी** :
नियुक्ती जरी राष्ट्रपती करत असला तरी पदच्युती मात्र महाभियोग च्यातूनच.

③ **स्थिर सेवा व शर्ती** -
वेतन, भत्ते, विशेषाधिकार रजा आणि निवृत्ती वेतन ठरविणे. आर्थिक आणीबाणी वगळता यात बदल करता येत नाही.

④ **खर्च - संचित निधीवर भारित**
संसदेत मतदान घेण्याची आवश्यकता नसते (मात्र चर्चा होऊ शकते)

⑤ **वागणुकीवर चर्चा नाही**
महाभियोगाचा कालावधी वगळता सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या कामकाजाबाबत, वागणुकीबाबत, संसदेत किंवा राज्य विधिमंडळात चर्चा करण्यास घटनेने बंदी घातलेली आहे.

⑥ **निवृत्तीनंतर व्यवसाय करण्यास बंदी**
सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त झालेले न्यायाधीश भारताच्या क्षेत्रातील कोणत्याही न्यायालयात किंवा प्राधिकरणात वकीली करू शकत नाही.

⑦ **अवमान केल्यास शिक्षेचा अधिकार**
न्यायालयाचा अवमान केल्याच्या कारणावरून सर्वोच्च न्यायालय कोणत्याही व्यक्तीस शिक्षा करू शकते.

⑧ **कर्मचारी नियुक्तीचे स्वातंत्र्य**
कार्यकारी विभागाच्या हस्तक्षेपाशिवाय भारताच्या मुख्य न्यायाधीश सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करू शकतो - सेवाशर्तीसुद्धा ठरवतो.

⑨ **अधिकारक्षेत्र कमी करता येत नाही**
संसदेला सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार/अधिकारक्षेत्र कमी करण्याचा अधिकार नाही. मात्र संसद त्यांच्यात वाढ करू शकते.

## सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार आणि अधिकारक्षेत्र

### प्रारंभिक अधिकार क्षेत्र

संघराज्यातील विविध घटकांवर निर्णय - विवादावर

① केंद्र आणि एक किंवा अधिक घटकराज्ये.

② केंद्र व एक किंवा अधिक घटकराज्ये विरुद्ध एक किंवा अधिक घटक राज्ये.

③ दोन किंवा अधिक घटकराज्यातील वाद.

Scanned by CamScanner

या विवादासंदर्भात सर्वोच्च न्यायालय एकमेव प्रारंभिक अधिकारक्षेत्र.
म्हणजेच इतर कोणतेही न्यायालय या विवादावर निर्णय देवू शकत नाही.
ते अपिल किंवा वाद स्वरूपात असतील.

- राजकीय स्वरूपाच्या प्रश्नाचा यात समावेश नाही. विषयात तथ्य पाहिजे.
- खाजगी नागरिकाने केंद्राच्या किंवा राज्याच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या खटल्याचा समावेश होत नाही.

खालिलपैकी खालील बाबी देखील सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात येत नाहीत.

- राज्यघटनापूर्व काळातील तह, करार, कलमे, ठराव, व सनद अशा दस्तऐवजातून उद्भवणारे विवाद.
- आंतरराज्यीय जलविवाद
- वित्त आयोगाकडे सोपवलेल्या बाबी.
- खर्च आणि विभुतीगमन याबाबत केंद्र व राज्ये यातील फेरव्यवस्था.
- केंद्र व राज्यांमधील वाणिज्यिक विवाद.
- केंद्राकडून राज्याला मिळणारी नुकसानभरपाई.

* प्रारंभिक अधिकार क्षेत्रातील पहिला खटला ⇒ १९६१ - प. बंगाल विरुद्ध केंद्र.
केंद्राने केलेल्या कोळसा क्षेत्र संपादन व विकास कायदा १९५७ ला आव्हान.
निकाल - कायदा - वैध

## * आदेशाचे अधिकारक्षेत्र

मुलभूत हक्कांचे संरक्षण करण्यासाठी - बंदी प्रत्यक्षीकरण, परमादेश, प्रतिषेध, अधिकारपृच्छा आणि उत्प्रेक्षण हे आदेश देण्याचा अधिकार

→ आदेश देण्याचे उच्च न्यायालयाचे अधिकारक्षेत्र सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रापेक्षा विस्तृत आहे कारण सर्वोच्च न्यायालय केवळ मुलभूत अधिकारांच्या अंमलबजावणी साठीच आदेश देवू शकते उच्च न्यायालय त्याबरोबरच इतर कारणांसाठी देखील देवू शकते.

## * सल्लादायी अधिकारक्षेत्र

राष्ट्रपती खालील दोन मुद्याच्या बाबतीत सरन्यायाधिशाला सल्ला मागू शकतात

① सामाजिक हिताच्या दृष्टीने महत्वाचा विषय
② घटनापूर्व ठराव, करार, संकेत इ. संदर्भात

वरील क्र १ मधील विषयासंदर्भात सरन्यायाधीश सल्ला देवू शकतो किंवा सल्ला देणे नाकारू शकतो
क्र २ ″ ″ —————— सल्ला देणे बंधनकारक

राष्ट्रपतीवर दिलेला सल्ला स्विकारणे बंधनकारक नसते. स्विकारू शकतो/नकार देवू शकतो

Scanned by CamScanner

128

## अपिलांचे अधिकारक्षेत्र

अपिलाचे सर्वोच्च न्यायालय → म्हणून ब्रिटिश प्रिव्ही कौन्सिलचे स्थान.
प्राथमिकतः अपिलीय न्यायालय
अपिलांचे चार प्रकार.

1. घटनात्मक बाबींविषयी अपिले
2. दिवाणी खटल्याबाबत —"—
3. फौजदारी खटल्याबाबत —"—
4. विशेष पुनर्विचार .

### ① घटनात्मक बाबींविषयी

उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध अपिल करता येते मात्र यामध्ये घटनेचा अर्थ लावण्याची आवश्यकता आहे असा कायद्याचा प्रश्न आहे असे उच्च न्यायालयाने प्रमाणित करावे लागते. या प्रमाणपत्रानुसार कायद्याचा अर्थ चुकीचा लावला आहे यासाठी पक्षकार अपिल करू शकतो.

* **दिवाणी खटल्याबाबत अपील** – उच्च न्यायालयाने खालील प्रमाणे प्रमाणित केले तर
  - i) सर्वसामान्यांच्या दृष्टीने कायद्याचा प्रश्न आहे.
  - ii) सर्वोच्च न्यायालयाने निर्णय देण्याची आवश्यकता आहे.

सुरुवातीला २०,००० रकमेबाबतच – अपील करता येत होते.
सध्या ती मर्यादा काढून टाकली → घट्. ३०वी – १९७२.

### फौजदारी खटल्याबाबत अपील

अशा खटल्यामध्ये उच्च न्यायालयाने खालील कृती केल्या तर त्याच्या निर्णयाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात अपील करता येते.

i) उच्च न्यायालयात अपिल केल्यावर उच्च न्यायालयाने आरोपीला निर्दोष ठरविण्याचा निर्णय बदलून आरोपीस अपराधी ठरवून देहान्ताची शिक्षा दिली असेल.

ii) जर उच्च न्यायालयाने दुय्यम न्यायालयाकडून खटला स्वतःकडे घेतला आणि आरोपी सिद्ध होवून त्याला देहान्ताची शिक्षा दिली असेल.

iii) खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाकडे अपिल करावे असे उच्च न्यायालयाने प्रमाणीत केले;
पहिल्या दोन बाबींमध्ये अपील करणे हा अधिकार (प्रमाणपत्राची आवश्यकता नाही)
परंतु तिसऱ्या बाबीमध्ये प्रमाणपत्राची आवश्यकता.

* उच्च न्यायालयाने अपराध सिद्ध झाल्याचा निर्णय बदलून संबंधित व्यक्तीची निर्दोष मुक्तता केली असेल तर त्याविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात अपिल करता येत नाही.

→ सन १९७० मध्ये फौजदारी खटल्यासंबंधी – देहान्तासोबतच → जन्मठेपेच्या किंवा १० वर्षांच्या शिक्षेसाठी

## विशेष पुनर्विचार

सैनिकी न्यायाधिकरण आणि कोर्ट मार्शल वगळता देशातील इतर न्यायालये किंवा न्यायाधिकरणांनी कोणत्याही बाबतीत दिलेल्या निर्णयाविरुद्ध विशेष पुनर्विचाराला संमती देण्याचा विशेष अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे.

① विशेष अधिकार असून हक्क म्हणून मागता येणार नाही.

② अंतिम किंवा अंतरिम निकालाविरुद्ध.

③ कोणत्याही बाबीसंबंधी- घटनात्मक/दिवाणी/फौजदारी/आयकर/कामगार/महसूल बाबीत इ.

## अभिलेख न्यायालय

① सर्वोच्च न्यायालयाच्या कृती, प्रक्रिया आणि निर्णय यांचा संदर्भ व दाखला यांची कायमस्वरूपी नोंद. नोंदींना साक्ष म्हणून ग्राह्य धरले जाते. कोणत्याही न्यायालयात त्याला आव्हान देता येत नाही

② न्यायालयाचा अवमान – सहा महिने साधी कैद / रु 2000 रु दंड किंवा दोन्ही.
देशातील उच्च न्यायालये, कनिष्ठ न्यायालये आणि न्यायाधिकरणे यांच्या अवमानाबद्दल

न्यायालयाचा अवमान दिवाणी किंवा फौजदारी स्वरूपाचा असू शकतो.

दिवाणी ⇒ न्यायालयाचे निर्णयाचे, आदेशाचे, हुकुमाचे हेतुपरस्पर उल्लंघन करणे

फौजदारी ⇒ ① न्यायालयाच्या अधिकाराचे उल्लंघन किंवा हनन करणे ——— किंवा
② न्यायालयीन प्रक्रियेत हस्तक्षेप करणे / पूर्वग्रह निर्माण करणे.

परंतु → 1) न्यायालयीन प्रक्रियेचा योग्य व अचूक अहवाल देणे.
2) खटल्याच्या बाबींचे निर्दोष प्रकाशन आणि वितरण
3) न्यायिक कृतीवर केलेली योग्य व रास्त टीका.
4) न्यायालयाच्या प्रशासकीय बाजूवर केलेले विधान.

## इतर अधिकार

① राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांच्या निवडणुकीतील विवादाबाबत निर्णय

② केंद्रीय लोकसेवा आयोग अध्यक्ष व सदस्य कामकाजाची किंवा वर्तणुकीची चौकशी करू शकते. दोषी आढळल्यास राष्ट्रपतींना त्यास पदच्युत करण्याची शिफारस करू शकते. हा सल्ला राष्ट्रपतींवर बंधनकारक.

③ आपलाच निर्णय किंवा आदेश याचे पुनर्विलोकन करण्याचा अधिकार

④ उच्च न्यायालयाकडील प्रलंबित खटला काढून घेऊन स्वतः निर्णय देण्याचा सर्वोच्च न्यायालयास अधिकार - तसेच एका उच्च न्यायालयातील प्रलंबित खटला किंवा अपील दुसऱ्या उच्च न्यायालयाकडे वर्ग करण्याचा अधिकार

Scanned by CamScanner

③ ⑤ सर्वोच्च न्यायालयाचा कायदा देशातील सर्व न्यायालयावर बंधनकारक.

⑥ घटनेचा अर्थ लावणारी ही अंतिम संस्था.

⑦ देशातील सर्व न्यायालये आणि न्यायाधिकरणे यावर न्यायिक पर्यवेक्षण.

## सर्वोच्च न्यायालयातील वकील:

① वरिष्ठ वकील → सर्वोच्च किंवा उच्च न्यायालयाने मान्यता दिलेले वकील
वरिष्ठ वकील सर्वोच्च न्यायालयाच्या नोंदणीकृत वकीलाशिवाय व इतर कोणत्याही न्यायालयात कनिष्ठ वकीलाशिवाय हजर राहू शकत नाही.

② नोंदणीकृत वकील ⇒ फक्त याच प्रकारच्या वकीलांना सर्वोच्च न्यायालयात कोणतीही कागदपत्रे किंवा मुद्दे देण्याचा अधिकार
सर्वोच्च न्यायालयात बाजू मांडू शकतात किंवा पक्षकाराच्या वतीने काम करू शकतात.

③ इतर वकील → वकिली कायदा १९६१ अनुसार कोणत्याही राज्य वकील परिषदेमध्ये नोंदणी केलेले वकील म्हणजे इतर वकील.
सर्वोच्च न्यायालयात पक्षकाराच्या वतीने उपस्थित राहू शकतात व बाजू मांडू शकतात.
न्यायालयात कागदपत्रे सादर करण्याचा अधिकार यांना नसतो.

## न्यायिक पुनर्विलोकन

तत्वाचा उगम → अमेरिकेत → तत्कालिन मुख्य न्यायमूर्ती जॉन मार्शल - 1803 मध्ये.

भारतात ⇒ घटनेमध्येच न्यायिक पुनर्विलोकनाचा अधिकार.
घटनादुरुस्ती करून सुद्धा हा अधिकार कमी किंवा रद्द करता येत नाही.

### न्यायिक पुनर्विलोकनाचा अर्थ

केंद्र सरकार व राज्य सरकार - विधिमंडळांनी केलेल्या कायद्यांच्या व प्रशासकीय आदेशांच्या घटनात्मक वैधतेचे परीक्षण करणे - म्हणजे न्यायिक पुनर्विलोकन.
जर परीक्षण केल्यानंतर ते घटनेचे उल्लंघन करणारे किंवा अवैध आढळले तर न्यायसंस्था त्यांना बेकायदेशीर व घटनाबाह्य घोषित करू शकते.
न्यायमूर्ती सय्यद शाह मोहम्मद कादरी यांनी पुनर्विलोकनाचे तीन प्रकारात वर्गीकरण केले.

① घटना दुरुस्त्यांचे न्यायीक पुनर्विलोकन
② कायद्यांचे —— " ——
③ प्रशासकीय कृतींचे —— " ——

~~[illegible]~~ सर्वोच्च न्यायालयाने अनेक खटल्यामध्ये असा अधिकार वापरला आहे. उदा.
गोलकनाथ खटला (१९६७), बँक राष्ट्रीयीकरण खटला (१९७०), संस्थानिकांचे तनखे रद्द करणे (१९७१)

Scanned by CamScanner

केशवानंद भारती (१९७३), मिनर्व्हा मिल्स खटला (१९८०)

२०१५ मध्ये – ९९ वी घ.दु. – २०१४ } अवैध ठरवले.
व राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोग २०१४

## न्यायिक पुनर्विलोकन घटनात्मक तरतुदी

१) कलम – १३ – मूलभूत हक्कांशी सुसंगत नसलेले कायदे अवैध.
२) कलम – ३२ – अंमलबजावणी
३) कलम – १३१ – प्रारंभिक अधिकार क्षेत्र
४) कलम – १३२ – अपिलाचे —"—
५) कलम – १३३ – दिवाणी दाव्यांचे अपील
६) कलम – १३४ – फौजदारी —"—
७) कलम – २२६ – उच्च न्यायालयांना आदेश काढण्याचा अधिकार
८) कलम – २२७ – सर्व न्यायालये व न्यायाधिकरणे यांवर पर्यवेक्षण. (सैनिकी न्याया. वगळून)

इत्यादी.

## न्यायिक पुनर्विलोकनाची व्याप्ती

कायदा किंवा कार्यकारी आदेश यांच्या घटनात्मक वैधतेला खालील ३ कारणांसाठी आव्हान देता येते.

① मूलभूत अधिकारांवर अतिक्रमण होत आहे.
② बनविलेला कायदा हा कायदा करणाऱ्या विभागाच्या अधिकार क्षेत्राबाहेरचा आहे.
③ संबंधित कायदा घटनात्मक तरतुदींशी विसंगत आहे.

## नवव्या परिशिष्टाचे न्यायिक पुनर्विलोकन

परिशिष्ट ९ मधील कायदे आणि नियम यांच्या विरोधात ते घटनेच्या मूलभूत हक्कांचा भंग करतात या कारणावरून दाद मागता येत नाही किंवा अवैध ठरविता येत नाही. असे संरक्षण ३१बी यांच्याद्वारे देण्यात आले आहे – पहिली घ.दु. – १९५१ ने कलम ३१ बी व परिशिष्ट ९ चा घटनेत समावेश.

## घटक न्यायिक सक्रियता

संकल्पनेचा उगम ⇒ अमेरिकेत - ऑर्थर श्लेसिंजर ज्युनिअर याने १९४७ मध्ये मांडली.

भारतात १९८० ते ९० या काळात न्यायमूर्ती कृष्ण अय्यर, पी.एन. भगवती, चिन्नपा रेड्डी, व डी.ए. देसाई यांनी न्यायीक सक्रियतेचा पाया घातला.

**अर्थ** - नागरिकांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी व समाजात न्यायाला चालना देण्यासाठी न्यायसंस्थेने स्वतःहून पुढाकार घेवून काम करणे.

उपेंद्र बक्षी या प्रख्यात कायदेतज्ञाने न्यायीक सक्रियता सुरू करणाऱ्या कार्यकर्त्यांचे खालील गट पाडले

1. नागरी हक्क कार्यकर्ते.
2. लोक हक्क कार्यकर्ते
3. ग्राहक हक्क चळवळ
4. बेरोजगार गट
5. पर्यावरण सुरक्षेसाठी नागरिक गट
6. सिंचन प्रकल्प विरोधी —॥—
7. बाल हक्कासंबंधी गट
8. कैद्यांच्या संदर्भात कार्य करणारा गट
9. स्थानिक लोकांच्या हक्कांसाठी लढणारा गट
10. महिला हक्कांसाठी झगडणारा गट
11. वकिली करणारांचा गट
12. प्रसारमाध्यमे सायत्ता गट.

## घटक - जनहित याचिका

संकल्पनेचा उगम २० व्या शतकात साठच्या दशकात ⟶ अमेरिकेत.

———॥——— नवव्या —॥—

भारतात
न्या. व्ही. आर कृष्ण अय्यर व न्या. पी. एन भगवती - हे प्रणेते.

त्यापूर्वी लोकस स्टॅंडी - पारंपारिक नियम — ज्याच्या हक्काचा भंग झाला आहे अशीच व्यक्ती उपाय म्हणून न्यायालयात जावू शकते.

जनहित याचिका - जनमानसातील कोणीही सदस्य दुसऱ्या व्यक्तीच्या हक्काच्या अंमल - बजावणीसाठी - न्यायालयात जावू शकतो.

**वैशिष्ट्ये** -
1. गरिब जनतेला न्याय मिळवा हा उद्देश -
2. यामध्ये पारंपारिक खटल्याप्रमाणे दोन पक्ष नसतात -- सार्वजनिक हित साध्य करणे हा हेतू.
3. सार्व. अन्यायाविरुद्ध उपाययोजना

**व्याप्ती** : खालील वर्गात येणाऱ्या पत्रांना व अर्जांनाच जनहित याचिका म्हणता येईल.
1. वेठबिगारी संबंधी
2. दुर्लक्षित मुले
3. कामगारांना किमान वेतन न देणे. किंवा पिळवणूक.
4. कैद्याच्या हक्कासंबंधी
5. पोलीसांकडून खोटा दृष्ट्यात कारवाई होत असल्यास
6. महिला अत्याचार
7. SC/ST / मागास प्रवर्गातील व्यक्तींचा छळ.

Scanned by CamScanner

⑧ पर्यावरण संदर्भात
⑨ दंगल प्रभावित लोकांचे अर्ज.

खालील बाबी जनहित याचिका गणल्या जाणार नाहीत.

① जमीन-मालक-भाडेकरू विवाद
② सेवाविषयक / निवृत्ती वेतन / उपदान बाबी-
③ केंद्र / राज्य / स्थानिक संस्था या विरुद्ध नसेल बाबी वगळून इतर तक्रारी.
④ वैद्यक किंवा इतर संस्थामधील प्रवेश
⑤ उच्च किंवा दुय्यम न्यायालयातील प्रलंबित असलेल्या खटल्यांची त्वरीत सुनावणी व्हावी या संबंधीचे अर्ज-

Scanned by CamScanner